# अक्षरलेणी

संपादक

डॉ. पंढरीनाथ धोंडगे । डॉ. विठ्ठल जंबाले । डॉ. कल्याण गोपनर



अथर्व पब्लिकेशन्स

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
यांच्या अभ्यासक्रमास अनुसरून व अभ्यास मंडळाच्या मान्यतेने
बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व इतर पदवी प्रथम वर्षासाठी श्रेयांक (CBCS)
पद्धतीनुसार द्वितीय भाषा मराठी अभ्यासक्रमास नेमण्यात आलेले पाठ्यपुस्तक
(सत्र पहिले) (MAR- S.L. -I)

# अक्षरलेणी


संपादक

डॉ. पंढरीनाथ धोंडगे
डॉ. विठ्ठल जंबाले
डॉ. कल्याण गोपनर



अथर्व पब्लिकेशन्स

अथर्व पब्लिकेशन्स

# अक्षरलेणी

© सर्व हक्क
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ISBN 13 : 978-93-88544-69-6
पुस्तक प्रकाशन क्र. ६७८

**प्रकाशक**
युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**
**धुळे :** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.
**संपर्क :** ९४०५२०६२३०
**जळगाव :** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव ४२५००१. **संपर्क :** ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
**ई-मेल :** atharvapublications@gmail.com
**वेबसाईट :** www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** १६ जुलै २०१९
**मुद्रितशोधन :** सुखदेव वाघ
**मुखपृष्ठ :** प्रशांत सोनवणे
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स

**मूल्य :** ₹ ७०/-

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.



''आपण विद्यार्थ्यांहून श्रेष्ठ व निराळे आहोत किंवा आपले स्थान वरचे आहे, ही जाणीव न ठेवता आपण त्यांचे एक स्नेही व सहकारी आहोत असे समजून एकरूप होण्याची, त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा शिक्षक मुलांना चांगले शिक्षण देऊ शकेल. मी स्वत:ला पुढीलप्रमाणे प्रश्न विचारायला आरंभ केला. मी स्वत:वर जितके प्रेम करतो तितकेच विद्यार्थ्यांवर करू शकेन काय? मी स्वत:ला जशी क्षमा करतो, तशी विद्यार्थ्यांना त्यांच्या चुकीबद्दल क्षमा करू शकेन काय? त्यांच्या सुखदु:खात मी सहभागी होऊ शकेन काय? मुलांच्या जीवनातील सर्व अवस्थांत मी त्यांच्याशी पूर्णपणे एकरूप होऊ शकेन काय? मी हे करू शकेन, असे मला वाटले आणि समर्पणाच्या भावनेतून मी शिक्षकाचे काम स्वीकारले.''

**– स्वामी रामानंद तीर्थ**

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

- **प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख**
  अध्यक्ष तथा मराठी विभागप्रमुख, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
- **डॉ. पृथ्वीराज तौर**
  मराठी विभाग, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
- **डॉ. राजकुमार मस्के**
  मराठी विभागप्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर.
- **डॉ. मार्तंड कुलकर्णी**
  मराठी विभागप्रमुख, सरस्वती विद्या मंदिर कला महाविद्यालय, किनवट, जि. नांदेड.
- **डॉ. मथू सुरेश सावंत**
  मराठी विभाग, पीपल्स कॉलेज, नांदेड.
- **डॉ. सा. द. सोनसळे**
  मराठी विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी.
- **डॉ. पंढरीनाथ धोंडगे**
  मराठी विभाग, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि. परभणी.
- **डॉ. बी. बी. खंदारे**
  मराठी विभागप्रमुख, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत, जि. हिंगोली.
- **डॉ. जयद्रथ जाधव**
  मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, रेणापूर, जि. लातूर.
- **डॉ. विठ्ठल जंबाले**
  मराठी विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड.
- **प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे**
  मराठी विभागप्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
- **डॉ. वंदना महाजन**
  संचालक, का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे.
- **डॉ. सुनीता सांगोले**
  मराठी विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर.
- **अरविंद जगताप**
  १ बी ४०२, न्यू दिंडोशी, म्हाडा कॉम्प्लेक्स, मालाड (पू.), मुंबई - ९७.
- **फ. मुं. शिंदे**
  ८३, यमुना, महात्मा गांधीनगर, पदमपुरा, औरंगाबाद - ५.



## शुभेच्छा!

बदलता विद्यार्थी वर्ग आणि बदलते शिक्षण यांचा एकसंघ विचार करत मूल्यात्मक ज्ञानाची गरज ओळखून भाषा, साहित्याचा तसेच संस्कृतीचा विचार अभ्यासक्रमांच्या मध्यवर्ती असायला हवा. कारण, काळाची दृष्टी बदललेली आहे. तसेच विद्यार्थ्यांची अभिरुचीही बदललेली आहे. या अनुषंगाने एकूण अभ्याससाधनांची रचना बदलायला हवी. 'विविधता' ही आपल्या अभ्यासक्रमांची ओळख असायला हवी. या दृष्टीने, मराठी भाषा आणि साहित्याच्या या नव्या अभ्यासक्रमांची मांडणी केलेली आहे. ही मांडणी एकंदर विद्यार्थीकेंद्री असून, या विद्यापीठाच्या अशा पाठ्यपुस्तकांमधून तसेच या प्रकारच्या संपादनांमधून सरळपणे जाणवते! म्हणूनच, या पाठ्यपुस्तकांचे अध्ययन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसह सर्व शिक्षकांना यानिमित्त माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. उद्धव भोसले**
कुलगुरू,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

## संपादकीय...

कला, साहित्य, संस्कृती, क्रीडा आणि शिक्षण या आदर्श मानवी मूल्यांना कवेत घेऊन यशस्वी वाटचाल करणाऱ्या कला, वाणिज्य, विज्ञान व इतर विद्याशाखांतील पदवी प्रथम वर्षातील नवप्रवेशित विद्यार्थ्यांना वाचन, आकलन, आस्वाद आणि विश्लेषण याबद्दल साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी पहिल्या सत्रात 'द्वितीय भाषा मराठी' अभ्यासपत्रिकेतील अभ्यासक्रमामध्ये 'अक्षरांच्या लेणी' साकारत आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू मा. डॉ. उद्धव भोसले यांच्या 'भाषा, साहित्य आणि संस्कृती या विचारांना मध्यवर्ती ठेवून बदलत्या अभिरूचींना विद्यार्थिकेंद्री पुरक अभ्यासक्रम असावेत' या गाभाघटकांना अनुसरून मराठी अभ्यासमंडळाने 'अक्षरलेणी' हे पुस्तक सिद्ध केले आहे. मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या 'पाठ्यपुस्तके व अभ्यासक्रम हे जीवनविचार, मूल्यशिक्षण आणि एकविसाव्या शतकातील ज्ञानक्षेत्रातील विविध संधी यांचा सर्वंकष विचार करणारे आहेत', या विश्वासार्हतेमधून प्रस्तुत अभ्यासक्रमाची बांधणी केलेली आहे. तसेच मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. केशव सखाराम देशमुख यांना अपेक्षित असलेले व त्यांच्या संपूर्ण मार्गदर्शनाखाली आणि मराठी अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांच्या अनमोल सहकार्यातून संपादित केलेले 'अक्षरलेणी' हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

या पुस्तकाच्या शीर्षकामध्ये 'अक्षरत्व' आणि 'लेणी' हे दोन शब्द सांस्कृतिक संचितामधील पाऊलखुणांचे निदर्शक स्थळे आहेत. मराठी सारस्वतांमध्ये चिरंतन ठरलेल्या शब्दशिल्पाचे अध्ययन आणि अध्यापन घडावे, नवोदित विद्यार्थ्यांमध्ये साहित्यसृजनाची नवचेतना जागवावी, आगामी काळातील लेखक-कवी व अन्य साहित्यिकांचे बिजांकूर फुटावेत, मराठी साहित्याबरोबरच मराठी भाषा अभ्यासाची रुजवण व्हावी, महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसांच्या प्रादेशिक अस्मितेसह भाषिक अस्मिता जोपासणे सुलभ व्हावे अशा बहुविध प्रयोजनांमधून मराठी अभ्यास मंडळाने 'अक्षरलेणी' या ग्रंथाचे संपादन केलेले आहे. महाविद्यालयीन पातळीवरील अध्यापक आणि विद्यार्थी यांना प्रस्तुत

पुस्तकातील पाठ्यक्रम नक्कीच आवडतील. शिवाय त्यामधून अध्ययन आणि अध्यापनाची आवड वर्धित होईल, वाचन संस्कृती रुजेल, विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्य तथा मराठी भाषा याविषयी अभिरुची वृद्धींगत होईल यादृष्टीने 'अक्षरलेणी' ग्रंथातील घटकांची निवड केलेली आहे. गुणवत्तापूर्ण साहित्य, साहित्यातील निवडक मजकूर आणि भाषाभ्यासातील उपयुक्तता या बाबी विचारात घेऊन प्रस्तुत अभ्यासक्रमामध्ये गद्य, पद्य आणि उपयोजित मराठी अशा तीन विभागात वाङ्मयीन व्यवहार समृद्ध करणारे घटक समाविष्ट केलेले आहेत.

साहित्य आणि भाषा यांचा अभ्यास हा कधीच अंतीम नसतो. मराठी साहित्यामध्ये जे चांगले निर्माण झालेले आहे, तेच अभ्यासक्रमात अंतर्भूत केले पाहिजे. यादृष्टीने मराठी अभ्यास मंडळ वाटचाल करू पाहते. तात्पर्य, प्रस्तुत अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने या पुस्तकात वेधकता आणि विविधता यांचा संयोग घडविलेला आहे. 'अक्षरलेणी' या ग्रंथनामावरूनही या अभ्यासक्रमाचे चिरंतनत्त्व घडेल, अशी अपेक्षा वाटते. या अभ्यासक्रमासाठी निवडण्यात आलेल्या गद्य, पद्य व उपयोजित मराठी या तिन्ही विभागातील अभ्यासघटक अभ्यासल्यानंतर गुणवत्ता आणि वाङ्मयीन मूल्ये या सूत्रांचा मध्यवर्ती विचार करण्यात आलेला आहे, याचे प्रत्यंतर नक्कीच येईल.

मराठी भाषेतील आद्यचरित्रकार म्हाइंभट यांनी संकलित केलेल्या 'लीळाचरित्र'मधील 'ससीक-रक्षण' ही 'लीळा' मराठी साहित्याच्या आरंभकाळात मराठी गद्याचे स्वरूप कसे होते यासह तत्कालीन भाषावैशिष्ट्ये, लोकजीवन, प्रवृत्ती, परंपरा व साहित्य यांची माहिती मिळविण्यासाठी अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे. शिवकालीन मराठी गद्य आणि मराठी भाषेचे तत्कालीन स्वरूप अभ्यासण्यासाठी रामचंद्रपंत अमात्य यांच्या 'आज्ञापत्र'मधील 'साहुकार म्हणजे राज्याची शोभा' हा घटक अतिशय उपयोगी ठरणारा आहे.

आधुनिक विद्यार्थ्यांची बौद्धिक आणि वैचारिक पातळी रोडावत खाली चालली असून आजच्या विद्यार्थ्यांनी भूतकालीन प्रज्ञावंत तथा प्रतिभावंतांचे तत्त्वज्ञान आत्मसात करावे, विद्यापीठाच्या प्रत्येक हालचालीवर कटाक्षाने लक्ष देऊन आपले हित साधले पाहिजे, नेहमी सजग राहून नव्या निर्माण होणाऱ्या जीवनमूल्यांची दखल घेतली पाहिजे, हे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'भावी जीवनाची उभारणी विद्यापीठात होते...' या प्रातिनिधिक भाषणामधून अभ्यासक्रमात समाविष्ट



केले आहेत. डॉ. आंबेडकरांचे हे विचार विद्यार्थ्यांना सजग करणारे व दिशादर्शक ठरणारे असे आहेत. काळानुरूप बदलती भाषा, संस्कृती आणि साहित्य या बाबी संवर्धीत करण्यासाठी अभ्यासक्रमातील वेचे आधारभूत ठरतात.

भारतीय युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट खेळाडू म्हणून ठसा उमटविण्यासाठी क्रीडासंस्कृती रुजण्याची गरज आहे. हे लक्षात घेऊन निवडण्यात आलेला डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा 'क्रीडासंस्कृतीची गरज' हा लेख क्रीडापटूंच्या व्यक्तिमत्त्व विकासाला निश्चितच चालना देणारा आहे. डॉ. हिंमतराव बावस्करांचे जागतिक कीर्तीचे संशोधन, सर्पदंश आणि विंचूदंशावरील गुणकारी औषध लोकोपयोगी आहेच. त्यांच्या 'बॅरिस्टरचं कार्टं' या आत्मचरित्रामधील 'पदरी पडलं पवित्र झालं' हा उतारा युवापिढीमध्ये संशोधनवृत्ती जागविण्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकणारा आहे. तसेच साधनाताई आमटे यांचे व्यक्तिमत्व ठसठसित करणारा डॉ. मंदा आमटे यांचा लेख वाचकांना सुसंस्कारांची शिदोरी संवर्धित करेल. अनुभवाची समृद्धता आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे व्यक्तिमत्त्व, पिडित-उपेक्षितांच्या सेवेचा आदर्श प्रकट होण्यासाठी 'आमची आई : साधनाताई' हा वेचा अतिशय प्रेरणादायी वाटणारा आहे. 'झाडं लावणारा माणूस' या मकरंद कुलकर्णी यांच्या लेखातील झाडं लावणाऱ्या व पर्यावरण संगोपनाचे कार्य करणाऱ्या महान विभूतीचा परिचय मराठी अभ्यासकांना चिरंतन प्रेरणा देणारा आहे.

मराठी साहित्यामध्ये कथालेखनाचे निराळे परिमाण घेऊन रचना, आशय आणि अभिव्यक्ती यादृष्टीने कृष्णा किंबहुने यांची 'द्योतक' ही कथा निवडलेली आहे. सामाजिक मूल्यांची मांडणी करताना वर्तमान लेखनामध्ये वेगळेपण नोंदवणारी ही कथा अभ्यासकांना वेगळा प्रत्यय दिल्याशिवाय राहणार नाही.

एकूणच प्रस्तुत अभ्यासक्रमात गद्य घटकांची केलेली निवड ही अभ्यासक्रमाचा विस्तार आणि मर्यादा लक्षात घेता समुचित आणि डोळस आहे, असे म्हणता येईल. मराठीचे अभ्यासक्रम नावीन्यपूर्ण असावेत, अभ्यासक्रमाची गुणवत्ता विद्यार्थ्यांमध्ये साहित्यविषयक अभिरूची संवर्धित करण्यास मदत करणारी असावी, या हेतूने प्रस्तुत घटकनिवड आणि ग्रंथसिद्धता करण्यात आली आहे.

अभ्यासक्रमातील पद्य विभाग हाही महत्त्वाचा असून पद्य घटकांची केलेली निवड ही उगमकाळापासून ते समकालापर्यंत कवितेचा प्रवास

कसा बदलत गेला? याचा वेचक मागोवा घेणारी आहे. विषयवैचित्र्य, भाषावैविध्य, अनुभवांचे आगळे आविष्कार आणि वास्तवाला भिडण्याचे सामर्थ्य या बाबी विचारात घेवून कवितांची निवड करण्यात आलेली आहे. संत सावता माळी, अनंत फंदी, माधव जूलियन, वामनदादा कर्डक, ना.धों. महानोर, गोविंद काळे, पी. विठ्ठल, स्वाती शिंदे-पवार या कवीं-कवयित्रींच्या अंतर्भूत केलेल्या काव्यरचना विषय आणि आशयसौंदर्यदृष्ट्या लक्षणीय आहेत. मानवी जीवनमूल्ये, निसर्ग आणि मानव यांच्यातील ऋणानुबंध, सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांचा आविष्कार आणि समकालीन वास्तवाचा वेध घेण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमात निवडलेल्या कविता महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या आहेत.

आजपर्यंत मराठी वाङ्मयामध्ये लेखक-कवींनी कसदार स्वरुपाचे भरघोस लेखन केलेले आहे. कथा, कादंबरी, कविता, चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक लेख इत्यादी वाङ्मयप्रकारांच्या माध्यमातून गद्य-पद्य निर्मिती केलेली आहे. परंतु अभ्यासक्रमाचा निर्धारित आकार लक्षात घेता अशा सर्वच प्रकारच्या लेखनाचा अंतर्भाव अभ्यासक्रमातील एखाद्या पुस्तकात करणे केवळ अशक्यप्राय असते. तेव्हा प्रातिनिधीक स्वरूपात गुणवत्ता जोखून, वाचन अभिरूचीचा विचार करून तथा साहित्यातील सामाजिक दृष्टी नजरेआड न करता विद्यार्थ्यांचे-वाचकांचे भाषा-साहित्यविषयक तत्त्व जपत अभ्यासक्रमाची बांधणी करावी लागते. त्यादृष्टीने 'अक्षरलेणी' या महत्त्वाच्या क्रमिक पुस्तकातील घटक प्रचिती देतील.

पाठ्यपुस्तकातील तिसऱ्या विभागात निवडलेला 'उपयोजित मराठी'चा अभ्यासक्रम हा लेखन, सर्जन, व्यवहार आणि ज्ञान यांचा सामुहिक विचार करून नवतंत्रज्ञानाची सांगड घालणारा असा आहे. 'प्रमाण मराठी लेखनाचे अनुस्वारविषयक नियम' लेखनातील गतिमानता व अचूकतेसाठी सहाय्यभूत ठरतील. तसेच 'शब्दांच्या जाती' या अभ्यासातून मराठी भाषाज्ञान प्रगल्भ बनेल. याकरिता लेखन संवर्धन करणारे हे उपयोजित मराठीतील घटक महत्त्वाचे वाटतात.

'अक्षरलेणी' ही संज्ञा मूळात साहित्यातील अनमोल रत्नांच्या खाणी सूचित करणारी आहे. नवलेखन, नवविचार समाजात जन्माला येतच असतात. तसेच 'अक्षरलेणी' साकारत आहे. मात्र ते भाषा आणि साहित्य क्षेत्रातील अंतीम शब्द नव्हेत. काही तरी चांगले निर्माण करण्याचा मराठी अभ्यास मंडळाचा हा अल्पसा प्रयत्न आहे. हे पाठ्यपुस्तक वाचल्यानंतर वाचकांची जिज्ञासा वाढावी, त्यांनी चिंतनप्रवण बनावे,



वाचन संस्कृती वाढण्यास मदत व्हावी, अशी अपेक्षा आहे.

'अक्षरलेणी' हे पुस्तक विद्यार्थिभिमुख करण्याकडे अधिक प्रयत्न करण्यात आले आहेत. याचा प्रत्यय प्रस्तुत पाठ्यपुस्तकात निवडलेल्या कविता पाहिल्यानंतर नक्कीच येईल. या पुस्तकांमधील 'उपयोजित मराठी' हा विभाग विद्यार्थ्यांच्यादृष्टीने उपयोजनमूलक, कौशल्यवृद्धी करणारा आणि माहिती-तंत्रज्ञानाशी संबंध निर्माण करणारा आहे.

उपलब्ध साहित्य, विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता, निर्धारित अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तकाची व्याप्ती यासह इतर सर्व घटक व सर्व मर्यादा लक्षात घेऊन सर्वांच्या सहकार्याने हे पाठ्यपुस्तक नेटके तथा व्यवस्थित करण्याचा प्रामाणिक व आटोकाट प्रयत्न केलेला आहे.

त्यामुळे ही 'अक्षरलेणी' वाचकांच्या पसंतीस उतरेल, ती भाषा व साहित्याच्या अभ्यासकाला अधिक उद्युक्त करील, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची व अभ्यासाची गोडी निर्माण करील, असा विश्वास वाटतो. विशेष म्हणजे संबंधित विद्यार्थी व शिक्षक वर्गाकडून या पुस्तकाचे निश्चितच स्वागत होईल, असाही विश्वास वाटतो. प्रस्तुत पाठ्यपुस्तक निर्मितीत अनेकांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्या सर्वांप्रति आमच्या मनात कृतज्ञतेची भावना आहे. ज्यांच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्यातून 'अक्षरलेणी' हे पाठ्यपुस्तक पुर्णत्वास गेले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत!

**– डॉ. पंढरीनाथ धोंडगे**
**– डॉ. विठ्ठल जंबाले**
**– डॉ. कल्याण गोपनर**

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग

१. **ससीक–रक्षण** ........................................ १९
- म्हाइंभट

२. **साहुकार म्हणजे राज्याची शोभा** ........................ २०
- रामचंद्रपंत अमात्य

३. **भावी जीवनाची उभारणी विद्यापीठात होते...** ................ २२
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

४. **क्रीडासंस्कृतीची गरज** ................................ २५
- डॉ. नरेंद्र दाभोलकर

५. **पदरी पडलं पवित्र झालं** ................................ २८
- हिंमतराव बावस्कर

६. **आमची आई : साधनाताई** ................................ ३३
- डॉ. मंदा आमटे

७. **झाडं लावणारा माणूस** ................................ ३८
- मकरंद कुलकर्णी

८. **द्योतक** ................................................ ४२
- कृष्णा किंबहुने

## पद्य विभाग

१. **समयासी सादर व्हावे** ................................ ५१
- संत सावता माळी

२. **बिकट वाट वहिवाट नसावी** .............................. ५२
- अनंत फंदी

३. **आईची आठवण** ........................................ ५४
- माधव जूलियन

४. **माणसा इथे मी तुझे गीत व्हावे** ........................ ५६
- वामनदादा कर्डक

५. **सूर्यनारायणा** ........................ ५७
- ना. धों. महानोर

६. **उतराई** ........................ ५८
- गोविंद काळे

७. **ही पृथ्वी स्त्रीलिंगी आहे** ........................ ६०
- पी. विठ्ठल

८. **सूप आणि जातं** ........................ ६२
- स्वाती शिंदे-पवार

## उपयोजित मराठी

१. **प्रमाण मराठी लेखनाचे अनुस्वारविषयक नियम** ........................ ६५
२. **शब्दांच्या जाती(संक्षिप्त परिचय)** ........................ ६८